**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८**
**ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३**
**सभावृत्तांत**
**कार्यपत्रिका क्र. ३**

दिनांक :- २१/०५/२०१४ वेळ :- दु. १२.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दिनांक २१/०५/२०१४ रोजी दु. १२.०० वा. ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

१. मा. शमीम पठाण सभाध्यक्ष
२. मा. सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
३. मा. चिंचवडेपाटील आश्विनी गजानन
४. मा. को-हाळे अनंत सुभाष
५. मा. गावडे जयश्री वसंत
६. मा. साबळे छाया जगन्नाथ
७. मा. जगताप विमलताई सुरेश
८. मा. पवार अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा
९. मा. बारणे झामाबाई बाळासाहेब
१०. मा. पवार यमुनाताई रमणनाना
११. मा. गायकवाड विनय उर्फ विनायक रमेश
१२. मा. कलाटे स्वाती मयूर

खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

मा. क्षेत्रीय अधिकारी सुभाष माछरे, प्र. प्रशासन अधिकारी भगवान बोऱ्हाडे, लेखाधिकारी- एस.टी. आव्हाळे, मा. कार्यकारी अभियंता – रविंद्र दुधेकर, गोपाळ चिंचवडे, उपअभियंता,- के. डी. फुटाणे, एस.एम. कुदळे, एन. आर. निबाळकर, व्ही.एन.देसले, एम.एम. चव्हाण, सहा. आरोग्याधिकारी - जे.एस. जानकर, एस.एस. कुलकर्णी, जी.एस. देशपांडे, उद्यान - डी. के. बैचे इत्यादी.

\- - - - - -

(सभा भरवणेसाठी नेमलेल्या वेळी मा. सभापती सभागृहात उपस्थित नव्हते.)

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक - मा. पवार यमुनाताई रमणनाना अनुमोदक- मा. कलाटे स्वाती मयूर

सभा भरवणेसाठी नेमलेल्या वेळी मा. सभापती अपरिहार्य कारणामुळे सभागृहात उपस्थित नसलेने, उपस्थित सन्मा. सदस्यांमधून मा. शमीम पठाण यांची सभेच्या अध्यक्षस्थानी निवड करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

(मा. शमीम पठाण यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारले.)

सर्वप्रथम मा. सभाध्यक्ष मा. शमीम पठाण यांनी उपस्थितांचे स्वागत केले व सभेचे कामकाजास सुरुवात झाली.

**दि. २८/०४/२०१४ (कार्यपत्रिका क्र.१) रोजी झालेल्या सभेचा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा. सभाध्यक्ष यांनी प्रकट केले.**

**उपस्थित सन्मा सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र. २ प्रभाग क्र. ४२ भाटनगर प्रभागामधील रात्र निवास शाळेच्या जागेवर नविन बांधकाम करणेकामी मंजुरी देणेबाबत.

विषय क्र. ३ ब प्रभाग क्षेत्रातील प्रभाग क्र. २०,२१,२२,२३,२४,४९,५०,५२,५३ मधील स्ट्रॉर्म वॉटर चेंबर्स साफ सफाई करुन गाळाची वाहतुक करणेबाबत.

ठराव क्र. ३ विषय क्र. १
दि. २१/०५/२०१४ विभाग : सन्मा सदस्यांचा विषय
सुचक : मा. गायकवाड विनय उर्फ विनायक रमेश अनुमोदक: मा. चिंचवडेपाटील आश्विनी गजानन
संदर्भ : मा. गायकवाड विनय उर्फ विनायक रमेश यांचे दि. ०४/०४/२०१४ रोजीचे पत्र.

प्रभाग क्र. ५३, वाकड, या प्रभागात कै. चिंधाजी धोंडीबा भुमकर यांची सर्व्हे नं. १४० मध्ये एकूण १ हे. २६ आर जागा होती. त्यापैकी ६० गुंठे जमीन ही नवीन रस्ते भूसंपादनमध्ये गेली आहे. कै. चिंधाजी धोंडीबा भुमकर हे वाकड येथील जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते होते. त्यांचा सामाजिक कार्यात मोठा सहभाग असायचा सर्व्हे नं.१४० मध्ये होत असलेल्या चौकास त्यांची स्मृती तेथील रहिवाशांच्या नेहमी स्मरणात रहावी यासाठी या चौकाला **कै. चिंधाजी धोंडीबा भुमकर (चौक)** असे नामकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ४ विषय क्र. २
दि. २१/०५/२०१४ विभाग : सन्मा सदस्यांचा विषय
सुचक : मा. साबळे छाया जगन्नाथ अनुमोदक : मा. सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
संदर्भ : मा. साबळे छाया जगन्नाथ यांचे दि. २१/०५/२०१४ रोजीचे पत्र.

प्र.क्र. ४२ भाटनगर प्रभागामध्ये समाज मंदिराची जागा असून सद्या त्या जागेवर रात्रनिवास प्रकल्प बांधण्यात आला आहे. रात्रनिवास स्थलांतर करुन त्या ठिकाणी तीन मजली इमारत बांधून ग्राऊंड, पहीला मजला, दुसरा मजला, इमारत बांधून प्रत्येक मजल्यावर एक वाचनालय, व्यायामशाळा व मिटींग हॉल या जागेवर बांधून मिळणे गरजेचे आहे. यापूर्वी झो.नि.पू. विभागाकडे माहिती कळवून काम चालू करणेकामी निवेदन दिले होते. परंतू सदर जागेची पाहणी करुन तांत्रिक अडचण दाखवून विषय नामंजूर केला होता. तथापि या इमारतीचा विषय सामाजिक असलेने सदर विषयास मंजूरी देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ५ विषय क्र. ३
दि. २१/०५/२०१४ विभाग : आरोग्य विभाग, ब क्षेत्रिय कार्यालय
सुचक : मा. साबळे छाया जगन्नाथ अनुमोदक : मा. सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
संदर्भ : ब.क्षे.का./०५/कावि/३१२/२०१४, दि. २१/०५/२०१४ रोजीचे पत्र.
मा. क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे

ब क्षेत्रीय कार्यालय कार्यक्षेत्रातील स्ट्रॉर्म वॉटर चेंबर्स साफ-सफाई करुन गाळाची वाहतूक करणेबाबत खर्चाचे अंदाजपत्रक मा. कार्यकारी अभियंता, स्थापत्य विभाग यांचेकडून मागविणेत आलेला आहे. ब क्षेत्रीय कार्यालयातील प्रभाग क्रमांक २०,२१,२२,२३,२४,४९,५०,५२,५३ मधील एकूण १८९९ स्ट्रॉर्म वॉटर चेंबर्स साफ-सफाई करुन गाळाची वाहतूक करणेबाबत कामकाजासाठी एकूण अंदाजे र.रु. ८,४२,००५/- (अक्षरी र.रु. आठ लाख बेचाळीस हजार पाच फक्त) इतका खर्च अपेक्षीत असलेबाबत कळविले आहे.

त्यानुसार ब क्षेत्रिय कार्यालयातील स्ट्रॉर्म वॉटर चेंबर्स साफ-सफाई करुन गाळाची वाहतूक करणेबाबत कामकाजाकरिता उपरोक्त अंदाजपत्रकात र.रु. ८,४२,००५/- इतका खर्च अपेक्षीत आहे.

सन २०१४-१५ करिता स्ट्रॉर्म वॉटर चेंबर्स साफ-सफाई करुन गाळाची वाहतूक करणेबाबत कामकाजाकरिता उपरोक्त अंदाजपत्रकीय तरतूद ब क्षेत्रीय कार्यालय, आरोग्य विभागाकडील नाले साफ-सफाई या लेखाशीर्षावर र.रु.२०,००,०००/- इतकी करण्यात आलेली आहे. सदर बाबत प्रशासकिय मान्यतेकामी अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

वरीलप्रमाणे सभेचे कामकाज झाले मा. सभाध्यक्षा मा. शमीम पठाण यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
[ शमीम पठाण ]
सभाध्यक्ष
ब प्रभाग समिती, चिंचवड

पिंपरी चिंचव महानगरपालिका,
ब प्रभाग कार्यालय, चिंचवड ३३
जा. क्र. बप्र/२/कावि/५७/२०१४.
दिनांक : ५/०६०२०१४

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव( सभाशाखा )
ब प्रभाग समिती

प्रत
सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.